## नाशिक महानगरपालिका, नाशिक
## राष्ट्रीय फेरीवाला धोरण
## जाहीर नोटीस

पथविक्रेता (उपजिविका संरक्षण व पथविक्री विनियमन ) अधिनियम, २०१४ च्या कलम ३६ च्या पोटकलम (१) नुसार मा .महाराष्ट्र शासनाने केलेल्या महाराष्ट्र पथविक्रेता (उपजिविका संरक्षण व पथविक्री विनियमन) (महाराष्ट्र) नियम, २०१६ मधील प्रकरण चार नियम ११ च्या पोटकलम (४) (५) आणि नियम १२ मधील तरतुदींनुसार नाशिक महानगरपालिका नगर पथविक्रेता समितीवर नाम निर्देशनासाठी इच्छुक खालील संवर्गातील व्यक्तींकडुन अर्ज मागविण्यात येत आहेत.

(क) अशासकीय संघटना

(ख) समुदाय आधारीत संघटना

(ग) निवासी कल्याण संघ

(घ) व्यापारी संघ

(ङ) **पणन संघ**

अर्ज करण्यासाठी खालीलप्रमाणे अर्हता असून अर्जासोबत संबधित कागदपत्रे जोडणे आवश्यक राहील.

१) अर्जदाराचे वय २१ वर्षापेक्षा कमी नसावे.

२) अर्जदार हा मनपा करांचा थकबाकीदार नसावा.

३) अर्जदारास न्यायालयाने कोणत्याही गंभींर गुन्हयात शिक्षा ठोठावलेली नसावी.

४) संघटनेची किंवा संघाची संबधित सक्षम प्राधिकरणाकडे नोंदणीं असणे आवश्यक आहे. अर्जासोबत नोंदणीचे प्रमाणपत्राची प्रमाणित प्रत जोडावी.

५) संघटना किंवा संघ यांचे मागील तीन वर्षाचे सक्षम प्राधिकरणाकडुन तयार करण्यात आलेले लेखापरि क्षा अहवाल अर्जासोबत अर्जासोबत जोडणे आवश्यक राहील.

६)संघटनेस किंवा संघास नाशिक महानगरपालिकेने काळया यादीत टाकलेले नसावे.

७)संघटना किंवा संघ त्या-त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायदयान्वये सिध्ददोषी नसावेत.

८) संघटना किंवा संघ यांना , त्यांनी सक्षम प्राधिकरणाकडे नोंदणी केल्याच्या त्यांच्या प्रवर्गामधील कामाचा किमान पाच वर्षाचा अनुभव असावा. संघटनेचा किंवा संघाचा अनुभवाचा दाखला सोबत जोडावा.

याप्रमाणे अटीशर्ती पुर्ण करणा -या संघ/संघटना यांचे मार्फत इच्छुक व्यक्तींनी सोबतच्या विहित नमुन्यात दिनांक ०८/०४/२०१७ पावेतो पोहचतील अशा प्रकारे अर्ज करावेत. विहित नमुन्यात नसलेल्या , अर्धवट व मुदतीनंतर आलेल्या अर्जांचा विचार केला जाणार नाही , याची नोंद घ्यावी.

अर्ज पाठवावयाचा पत्ता:-
मा.आयुक्त,
नाशिक महानगरपालिका, नाशिक
राजीव गांधी भवन, शरणपुर रोड,
नाशिक-४२२००१.

Sd/-
**आयुक्त,**
**नाशिक महानगरपालिका, नाशिक**

फोटो

## नाशिक महानगरपालिका, नाशिक

नगर पथ विक्रेता समिती सदस्याकरीता अर्ज

[महाराष्ट्र पथविक्रेता (उपजिविका संरक्षण व पथविक्री विनियमन) (महाराष्ट्र) नियम, २०१६ मधील प्रकरण चार नियम ११ च्या पोटकलम (४) (५) आणि नियम १२.]

१)संघ/संघटना चे नांव :- ----------------------------------------

२)संघ/संघटना चा नोंदणी क्रमांक व दिनांक :----------------------------------------

३)अर्जदाराचे पूर्ण नांव :- ----------------------------------------

४)वय :- ----------------------------------------

५)व्यवसाय /धंदा :----------------------------------------

६)संपूर्ण पत्ता (उमेदवाराने आपला पोष्टाचा पत्ता नमुद करावा) :- ----------------------------------------
----------------------------------------

७)संघ/संघटनेवरील कामाचा अनुभव :- ----------------------------------------

८)शिफारस करणा-या संघटनेच्या पदाधिका-याचे नांव, पदनाम, व स्वाक्षरी. :- ----------------------------------------
----------------------------------------

(संघटनेच्या पारीत ठरावाची प्रत सोबत जोडावी.)

### <u>अर्जदाराचे करावयाचे घोषणापत्र</u>

मी याव्दारे घोषित करतो/करते की मी ------------------------------------ नगर पथ विक्रेता समितीमध्ये सदस्य म्हणुन काम करणेसाठी संमती आहे. मी असेही घोषित करतो की,

१)माझ्या वयाची--------------------वर्षे पुर्ण झाली आहे.

२)महानगरपालिका नियमानुसार देय असलेली कोणत्याही रक्कमेची थकबाकी माझे नांवावर शिल्लक नाही.

३)मला न्यायालयात कोणत्याही गंभीर गुन्हयातशिक्षा झालेली नाही. सोबत पोलीस खात्याकडील चारीत्र पडताळणीचा दाखला जोडला आहे.

४)मी वेळोवेळी शासनाचे नियमांचे पालन करीन.

५)संघटनेची /संघाची सक्षम प्राधिकरणाकडे नोंदणी केलेली असलयाचा दाखला जोडला आहे.

६)संघटना /संघाच्या मागील तीन वर्षाचे सक्षम प्राधिकरणाकडुन तयार करण्यात आलेले लेखापरिक्षा अहवाल सोबत जोडले आहे.

७)संघटना / संघ यांना, त्यांनी सक्षम प्राधिकरणाकडे नोंदणी केल्याच्या त्यांच्या प्रवर्गामधील कामाचा किमान पाच वर्षाचा अनुभव असलेबाबतचा दाखला जोडला आहे.

दिनांक / /२०१७ अर्जदाराची सही किंवा अंगठा

(अर्जदाराने रहिवास पुरावा म्हणुन रेशनकार्ड/आधारकार्ड/बँकेचे पासबुक पहिले पान/लीईटबील (अदयावत) /वाहन चालविण्याचा पुरावा यापैकी एकाची सत्यप्रत जोडणे आवश्यक आहे.)

नाशिक महानगरपालिका, नाशिक

राष्ट्रीय फेरीवाला धोरण विभाग

## जाहीर नोटीस

केंद्र शासनाने पथविक्रेता (उपजिविका संरक्षण व पथविक्री विनियमन) अधिनियम, २०१४ प्रसिध्द केला आहे. त्यानंतर सदर अधिनियमातील तरतुदीनुसार राज्य शासनाने पथविक्रेता (उपजिविका संरक्षण व पथविक्री विनियमन) ( महाराष्ट्र) नियम २०१६ दिनांक ३ ऑगस्ट २०१६ रोजी प्रसिध्द केले आहेत . अधिनियमातील तरतुदींच्या अनुषंगाने योजना तयार केली आहे.

**योजनेचा सारांश:-**

१) या योजनेस , पथविक्रेता (उपजिविका संरक्षण व पथविक्री विनियमन ) ( महाराष्ट्र) योजना २०१६ असे संबोधण्यात येईल.

२) अधिनियम आणि नियम या नुसार पथविक्रेताचा व्यावसाय करणेसाठी पोषक वातावरण पुरविणे व त्यास चालना देणे हे या योजनेचे उददीष्ठ आहे.

३) या योजनेनुसा र नगर पथविक्रेता समितीमार्फत शहरातील विदयमान सर्व पथविक्रेत्यांचे सर्व समावेशक सर्वेक्षण योजनेसोबतच्या परिशिष्ठ १ मधील विहित नमुन्यात करण्यात येईल . सर्वेक्षण पुर्ण झाल्यानंतर ४५ दिवसात त्यास पर्याप्त प्रसिध्दी देण्यात येईल . त्यावर ३० दिवसात हरकती व सुचना मागविण्यात येऊन त्यानंतर हरकती सुचना विचारात घेऊन १५ दिवसात नोंदणीकृत पथविक्रेत्यांची अंतिम यादी प्रसिध्द करणेत येईल.

४) पथविक्रेता म्हणुन नोंदणी करणेसाठी पात्रता .

a)तो /ती भारताचा नागरिक असावा/असावी.

b)महाराष्ट्रातील अधिवासी असावा/असावी.

c)सर्वेक्षणाच्या दिनांकास पथ विक्रेत्याचे वय १४ वर्षापेक्षा कमी असणार नाही.

d)पथ विक्रीखेरीज उपजीविकेची इतर कोणतीही साधने असणार नाहीत.

५) अंतिम यादी प्रसिध्द झाल्यानंतर नोंदणीकृत पथविक्रेत्यांना विहित नमुन्यात विक्री प्रमाणपत्र आणि ओळखपत्र योजनेत विहित केले ल्या अटी-शर्तींना अधिन राहुन आणि ठरवून दिलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार निगर्मित करण्यात येईल.

६) विक्री शुल्क, दंड स्थानिक प्राधिकरणास अदा करणेबाबत योजनेच्या प्रकरण ४ मध्ये नमुद करण्यात आलेले आहे.

७) पथविक्री प्रमाणपत्राचे नुतनीकरण , निलंबन आणि रदद करण्याबाबतच्या तरतुदी प्रकरण ५ मध्ये विहित केलेल्या आहे.

८) नगर पथविक्री समिती विक्री प्रक्षेत्रे , विक्रीसाठी निर्बधित विक्री प्रक्षेत्रे आणि ना - विक्री प्रक्षेत्रे ६ महिन्याच्या कालावधीत निश्चित करील . स्वभाविक बाजारांची ठिकाणे , पारंपारिक आठवडे बाजार , रस्ते तसेच विशिष्ठ प्रयोजनासाठी समर्पित केलेली विक्री क्षेत्रे , उत्सव अथवा जत्रा च्या काळात तात्पुरते प्रक्षेत्रे निर्माण करण्यात येतील. त्याची कार्यपध्दीती घटनेत नमुद केलेली आहे.

९) योजनच्या प्रकरण ८ मध्ये राज्यस्तरीय नगर पथविक्रेता समिती , पथविक्रेत्यांवर लादता येतील असे द्रव्यदंड, पायाभूत सुविधामध्ये सुधारणा , पथविक्रेत्यांना प्रशिक्षण व कौशल्य विकास आणि आर्थिक सहाय्य तसेच इतर काही बाबी विहित केलेल्या आहेत.

Sd/-

**ठिकाण:- नाशिक** **अति. आयुक्त,**

**दिनांक:- २४/०३/२०१७** **नाशिक महानगरपालिका, नाशिक**